महिला बचत गट <बौद्धवाडी, माळवाडी, मोडवाडी>

रॅलिज इंडिया लि या टाटा उद्योग समुहाच्या कंपनीमार्फत विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून महिला सशक्तीकरण या कार्यक्रमाअंतर्गत त्यांनी आमच्या गावाला भेट देवून महिला सशक्तीकरण कार्यक्रम आखला या कार्यक्रमाअंतर्गत रॅलिज इंडियाच्या सौ. जिज्ञासा मॅडम व श्री अँथोनी सर यांनी महिला सशक्ती करणासाठी गावातील महिला बचत गटास मोलाचे मार्गदर्शन केले

महिला बचत गटाच्या माध्यमातून महिला सशक्तीकरण करण्यासाठी सौ जिज्ञासा मॅडम यांनी आमच्या बचत गटातील महिलांना विविध गृहोद्योगाचे प्रशिक्षण तज्ञांमार्फत उपलब्ध करुन दिले.

या प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून सप्टेंबर २०१८ मध्ये २ दिवसांचे ज्यामध्ये दिपावळीसाठी शोभिवंत वस्तू, दिवे, कंदिल बनविण्याचे प्रथम प्रशिक्षण आमच्या महिला बचत गटातील महिलांना दिले.

या प्रशिक्षणात तज्ञाकडून मोलाचे मार्गदर्शन आमच्या बचत गटास मिळाले. या प्रशिक्षणात बचत गटातील ३० महिलांनी सहभाग घेतला. (१७ बौद्धवाडी व १३ माळवाडी)

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पणत्या, कंदिल, रांगोळी व इतर शोभिवंत वस्तु बनविण्याचे साहित्य ~~रॅलिज~~ रॅलिज इंडिया लि या कंपनीने आमच्या बचत गटांना उपलब्ध करुन दिले. त्या प्रमाणे आम्ही ५ महिलांचा एक गट याप्रमाणे गटागटाने त्यापासून विविध वस्तू ज्यामध्ये पणत्या कंदिल, रांगोळी व इतर शोभिवंत वस्तु बनविल्या. रॅलिज इंडिया कंपनीने दिलेल्या प्रशिक्षणाचा आम्हाला विशेष फायदा झाला. या वस्तू करत असता आम्हाला खूप आनंद झाला.

गावातील अनेक लोकांनी आमच्या बचत गटाला भेट देवून आमच्या वस्तूंचे कौतुक केले व त्याचप्रमाणे त्या वस्तू करण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन व सहाय्य केल्याबद्दल रॅलिज इंडिया कंपनी पेही आभार मानले. शोभिवंत वस्तूबरोबरच इतर अनेक गृहोपयोगी वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण दिले, यामध्ये प्रात्यक्षिक दाखविल्यामुळे त्याचा खूप फायदा महिलांना झाला. या प्रशिक्षणात

पुजेची थाळी, मेणबत्ती स्टॅण्ड आणि रांगोळी, हळदी कुंकू स्टॅण्ड इ. वस्तू बनविण्याचे प्रात्यक्षिक झाले.
महिला सशक्तीकरणासाठी रॅलिज इंडिया लि. मार्फत राबविली जाणारे उपक्रम खरोखर खूपच उल्लेखनीय आहेत. बचत गटाच्या माध्यमातून आमच्या गावातील बौद्धवाडी माळवाडी भोईवाडीतील महिलांना उत्पन्नाचे साधन निर्माण करुन दिले आहे.
रॅलिज इंडियाने बचत गटांना प्रशिक्षण देण्या-बरोबरच वस्तू बनविण्यासाठी लागणारे साहित्यही उपलब्ध करुन दिले याही पुढे जावुन आमच्या बचत गटामार्फत तयार होणाऱ्या वस्तूंसाठी बाजारपेठ उपलब्ध करुन दिली. रॅलिज इंडियांच्या प्रयत्नामुळेच आम्ही बनविलेल्या वस्तूना शोभिवंत वस्तू वार्षिक बाजार पेठ उपलब्ध झाली व आमच्या वस्तू ग्राहकांपर्यंत पोहोचल्या.
रॅलिज इंडिया लि. या कंपनीचा हा सामाजिक उपक्रम खूपच उल्लेखनिय आहे. रॅलिज इंडियाचे श्री अँथोनी साहेब सौ. जिज्ञासा मॅडम, व श्री दिपककुमार जाधव साहेब यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य आम्हाला लाभले त्याबद्दल त्यांचे शतशः आभार

सौ. रोहिणी. रविंद्र. मोरे